# प्रेस नोट

ला.प्र.वि.,वाशिम.
दि.०६.०१.२०२२

**आरोपी १) प्रल्हाद निवृत्त घोडे, रा.पांगरी नवघरे, ता.मालेगाव, जि.वाशिम (उपसभापती, पंचायत समिती मालेगाव यांचे पती) २) संतोष तुळशिराम खुळे, रा.वाकळवाडी, ता.मालेगाव, जि.वाशिम यांना ४०००/- रुपयेची लाच स्विकारतांना रंगेहात पकडलेबाबत..**

| | |
|---|---|
| आरोपी नांव हुद्दा, व पत्ता | १) प्रल्हाद निवृत्ती घोडे, वय-५३ वर्ष, व्यवसाय शेती, रा.पांगरी नवघरे, ता.मालेगाव, जि.वाशिम (खाजगी ईसम)<br>२) संतोष तुळशिराम खुळे, वय-३३ वर्ष, रा.वाकळवाडी, पोस्ट मारसुळ, ता.मालेगाव जि.वाशिम (खाजगी ईसम) |
| लाचेची रक्कम | ४०००/-रुपये |
| लाच मागण्याचा हेतु | तक्रारदार यांचे स्वत:चे तसेच वडिलांचे नावे पंचायत समिती मालेगाव येथून घरकुल मंजुर करून देणेबाबत.. |
| सापळा अधिकारी | एस.यु.कांबळे, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वाशिम. |

तक्रारदाराने तक्रार दिली की, त्यांचे वडिलांचे नावे पंचायत समिती मालेगाव येथून घरकुल मंजुर करून देण्याकरीता आरोपी प्रल्हाद घोडे रा.पांगरी नवघरे हे लाचेची मागणी करीत असल्याबाबत तक्रारदार यांनी दि.०५.०१.२०२२ रोजी तक्रार दिली.

सदर तक्रारीवरुन दि.०५.०१.२०२२ रोजी पडताळणी केली असता आरोपी क्र.१ यांनी तक्रारदार व त्यांचे वडिलांचे, या दोघांचे घरकुलाचे काम करून देण्याकरीता २०,०००/-रूपये लाचेची मागणी केली. १०,०००/-रूपये काम करून देण्यापुर्वी मधुन ४०००/-रूपये यध्या देण्यास सांगितले, अशाप्रकारे लाचेची मागणी केली.

दिनांक ०६.०१.२०२२ रोजी सापळा कार्यवाही दरम्यान आरोपी क्र.१ यांचे वतीने आरोपी क्र.२ यांनी तक्रारदारास लाचेची मागणी करून लाच रक्कम ४०००/-रूपये स्वीकारली. वरून आरोपी क्र.२ यांचेकडून पंचासमक्ष लोचची रक्कम जप्त करून आरोपींना ताब्यात घेण्यात आले. आरोपी विरूध्द पोलीस स्टेशन मालेगाव येथे गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

सदर कार्यवाही मा.पोलीस अधीक्षक श्री.विशाल वि.गायकवाड, मा.अपर पोलीस अधिक्षक श्री.अरूण सावंत, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती व मा.पोलीस उपअधिक्षक श्री.गजानन आर.शेळके यांचे मार्गदर्शनात पो.निएस.यु.कांबळे, पो.नि.ममता अफुने व स्टाफ पो.हवा.अरविंद राठोड, पो.नाईक राहुल व्यवहारे, विनोद अवगळे, रविंद्र घरत, चा.पो.ना.मिलींद चन्नकेशला, ला.प्र.वि. वाशिम यांनी केली आहे.

शासकीय लोकरोवकाने, खाजगी इसमाने शासकीय काम करुन देण्यासाठी व करण्यासाठी लाचेची मागणी केल्यास त्याबाबत खालील क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन एस.यु.कांबळे, पोलीस निरीक्षक,लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वाशिम यांनी केले आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वाशिम दुरध्वनी क्रमांक- ०७२५२/२३५९३३
टोल फ्रि.नं. - १०६४
एस.यु.कांबळे- ९९२२२४३४३८

(एस.यु.कांबळे)
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,वाशिम.

Scanned by TapScanner